पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८

**मा.इ प्रभाग समिती**

कार्यपत्रिका क्रमांक-१

सभावृत्तांत

दिनांक -६/४/२०१६ वेळ – दुपारी ३.००

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मा.सभापती निवडीची सभा बुधवार दिनांक **०६/०४/२०१६** रोजी **३.०० वाजता** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील मा. महापौर कै.मधुकर रामचंद्र पवळे सभागृहात मा.श्रीम.प्रेरणा देशभ्रतार, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर पुणे. यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती . सदर सभेस खालील सन्मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
२. मा.आल्हाट मंदा उत्तम
३. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
४. मा.सुपे आशा रविंद्र
५. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
६. मा.मोहिनी ताई विलास लांडे
७. मा.अजित दामोदर गव्हाणे
८. मा.जालिंदर (बाप्पू) शिंदे
९. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
१०.मा.लांडे श्रध्दा बाजीराव
११.मा.Adv. नितीन ज्ञानेश्वर लांडगे
१२.मा.विश्वनाथ विठोबा लांडे
१३.

याशिवाय मा.श्री. चंद्रकांत इंदलकर - क्षेत्रीय अधिकारी, इ क्षेत्रीय कार्यालय, श्री.श्रीनिवास रा.दांगट- सभा सचिव तथा प्रशासन अधिकारी इ क्षेत्रीय कार्यालय हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त - पुणे महानगरपालिका (पीठासीन ( अधिकारी)** सन्मा.सदस्य ,उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करते आजच्या सभेत मा. इ प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा. विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे.मा.इ प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणूक मुक्त व निर्भयपणे पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणेबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.
**सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सूचना करते.**

**मा.प्रशासन अधिकारी तथा-सचिव(सभाशाखा )**

मा. इ प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणुक करणेकामी एकूण ४ नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेले आहे.त्यामधील उमेदवार,त्यांचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे.

| **अ.क्र** | **उमेदवाराचे नांव** | **पत्ता** | **सुचकाचे नांव** | **अनुमोदकाचे नांव** |
|---|---|---|---|---|
| १) | मा.आल्हाट मंदा उत्तम | मु.पो.मोशी, कुदळेवस्ती प्रभाग क्र. ६, अ मोशी | मा.गव्हाणे सुरेखा शंकर प्रभाग क्र.३४ अ गव्हाणेवस्ती | मा.वाबळे संजय मल्हारराव प्रभाग क्र. २९अ इंद्रायणीनगर |
| २) | मा.आल्हाट मंदा उत्तम | मु.पो.मोशी, कुदळेवस्ती प्रभाग क्र. ६, अ मोशी | मा.गव्हाणे सुरेखा शंकर प्रभाग क्र.३४ अ गव्हाणेवस्ती | मा.वाबळे संजय मल्हारराव प्रभाग क्र. २९अ इंद्रायणीनगर |
| 3) | मा.डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे | लांडे बिल्डींग, हॉटेल युवराज जवळ,लांडेवाडी, भोसरी – ३९. प्रभाग क्र. ३५ अ भोसरी गावठाण | मा.महेश किसनराव लांडगे प्रभाग क्र. ३४ ब गव्हाणे वस्ती | मा.नितीन प्रताप काळजे प्रभाग क्र.७अ च-होली. |
| ४) | मा.डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे | लांडे बिल्डींग, हॉटेल युवराज जवळ,लांडेवाडी, भोसरी – ३९. प्रभाग क्र. ३५ अ भोसरी गावठाण | मा.सौ.सुनिता (माई) पांडूरंग गवळी प्रभाग क्र. ३० ब, चक्रपाणी वसाहत | मा.सौ.शुभांगीताई संतोष लोंढे प्रभाग ३६ अ, लांडेवाडी |

-------

( प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा) यांनी त्यांना प्राप्त झालेले उपरोक्त एकूण चार नामनिर्देशन पत्रे मा.पीठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केली. मा.पीठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली.)

**अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त**
**पुणे महानगरपालिका**
**(पीठासीन अधिकारी)**

इ प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त दोन उमेदवाराच्या एकूण चार नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली असून चार नामनिर्देशन पत्रापैकी एक नामनिर्देशन पत्र अवैध ठरविण्यात आले आहे व तीन नामनिर्देशन पत्र वैध ठरविण्यात आले आहे.

त्यामध्ये मा. इ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या मा.आल्हाट मंदा उत्तम व मा.लांडे श्रध्दा बाजीराव या दोन रितसर वैधपणे नामनिर्देशीत उमेदवार आहेत.

उमेदवारास १५ मिनीटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.पीठासीन अधिकारी यांचेकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल.

(पीठासीन अधिकारी यांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेला दुपारी ३.०७ ते ३.२२ हा १५ मिनीटांचा कालावधी संपला.)

उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनीटांच्या अवधीमध्ये मा.इ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा.आल्हाट मंदा उत्तम यांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या वेळेमध्ये उमेदवारी अर्ज रितसर मागे घेतला असल्याने  मा.लांडे श्रध्दा बाजीराव हे एकच रितसर वैधपणे नाम निर्देशीत उमेदवार आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका इ प्रभाग समिती सभापती पदाचे एका जागेकरीता मा.आल्हाट मंदा उत्तम व मा.लांडे श्रध्दा बाजीराव या दोन उमेदवार यांनी एकूण ४ नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल केलेली असून छाननीअंती मा.आल्हाट मंदा उत्तम यांचे एक नामनिर्देशन पत्र वैध व एक नामनिर्देशन पत्र अवैध ठरलेली आहेत. त्यानुसार एकूण तीन नामनिर्देशन पत्र वैध ठरलेली आहेत.दोन उमेदवारांपैकी मा. आल्हाट मंदा उत्तम यांनी त्यांची उमेदवारी रितसर मागे घेतली असल्याने इ प्रभाग समिती सभापती पदाचे एका जागेसाठी मा.लांडे श्रध्दा बाजीराव  हे एकच उमेदवार असल्याने त्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे इ प्रभाग समिती सभापती म्हणून रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाली असल्याचे जाहिर करणेत येत आहे.

सही/-
श्रीम.प्रेरणा देशभ्रतार
पिठासन अधिकारी तथा
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर पुणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८
**मा.इ प्रभाग समिती**

**ठराव क्रमांक-१** **विषय क्रमांक – १**
**दिनांक -६/४/२०१६** **विभाग – प्रशासन**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका इ प्रभाग समिती सभापती पदाचे एका जागेकरीता मा.आल्हाट मंदा उत्तम व मा.लांडे श्रध्दा बाजीराव या दोन उमेदवार यांनीएकूण चार नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल केलेली असून छाननीअंती मा.आल्हाट मंदा उत्तम यांचे एक नामनिर्देशन पत्र वैध व एक नामनिर्देशन पत्रे अवैध ठरलेली आहेत. त्यानुसार एकूण तीन नामनिर्देशन पत्र वैध ठरलेली आहे. दोन उमेदवारांपैकी मा. आल्हाट मंदा उत्तम यांनी त्यांची उमेदवारी रितसर मागे घेतली असल्याने इ प्रभाग समिती सभापती पदाचे एका जागेसाठी मा. लांडे श्रध्दा बाजीराव  हे एकच उमेदवार असल्याने त्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे इ प्रभाग समिती सभापती म्हणून रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाली असल्याचे जाहिर करणेत येत आहे.

सही/-
श्रीम.प्रेरणा देशभ्रतार
पिठासन अधिकारी तथा
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर पुणे.

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय भोसरी-३९
जा.क्रं/इ.क्षे.का/०४/कावि/ १५७/२०१६
दिनांक -  ६/०४/२०१६.

**प्रत –**

सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८.**

मा.इ प्रभाग समिती सभापती निवडणूक २०१६

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २९ (अ)४

**इ प्रभाग समिती सभापती पदाकरीता वैधपणे नामनिर्देशीत केलेल्या सर्व उमेदवारांची नांवे**

| **अ.क्र** | **उमेदवारांचे नांव** |
|---|---|
| १ | मा.आल्हाट मंदा उत्तम |
| २ | मा.लांडे श्रध्दा बाजीराव |

दिनांक - ६/४/२०१६

सही/-
श्रीम.प्रेरणा देशभ्रतार
पिठासन अधिकारी तथा
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर पुणे.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८.**

मा.इ प्रभाग समिती सभापती निवडणूक २०१६

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २९ (अ)४

| अ.क्र | उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांचे नांव |
|---|---|
| १ | मा.आल्हाट मंदा उत्तम |

दिनांक - ६/४/२०१६

सही/-
श्रीम.प्रेरणा देशभ्रतार
पिठासन अधिकारी तथा
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर पुणे.

त्यानंतर नवनिर्वाचित सभापती मा.लांडे श्रध्दा बाजीराव यांचे अध्यक्षतेखाली विषयपत्रिकेवरील इतर विषय खालीलप्रमाणे मंजूर करणेत आले.

-------

ठराव क्रमांक – २ विषय क्रमांक -२

दिनांक – ६/४/२०१६ विभाग –इ प्रशासन

सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.अजित गव्हाणे

संदर्भ – इ प्रभाग समितीच्या मासिक सभेचा दिनांक व वेळ निश्चीत करणे

इ प्रभाग समितीची मासिक सभा ही प्रत्येक महिन्याचे पहिल्या बुधवारी दुपारी ३.०० वा.(पहिल्या बुधवारी सार्वजनिक सुट्टी/सुट्टया असेल तर दुस-या दिवशी) इ क्षेत्रीय कार्यालयाचे **“ संत ज्ञानेश्वर महाराज ”** सभागृहामध्ये आयोजित करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-------

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज होऊन नवनिर्वाचित सभापती मा.लांडे श्रध्दा बाजीराव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-

(मा. मा.लांडे श्रध्दा बाजीराव )
सभापती
इ प्रभाग समिती, भोसरी – ३९.

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय भोसरी-३९
जा.क्रं/इ.क्षे.का/०४/कावि/१५७ /२०१६
दिनांक - ०६ /०४/२०१६.

**प्रत –**

सर्व संबंधीत शाखा प्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.